


ऋणातून समृद्धीकडे

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता.चांदवड जि.नाशिक फोन नं.ः-२५२३३०

रजि.नं.ः एनएसके /सीएचडी/आरएसआर/सीआर/८४० दि.२९/०५/२००१

२० वी

## ❖ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ❖

**फक्त सभासदांसाठीच**

**जा.क.वा.स.सन.२०२१** **दि.१३/०८/२०२१**

आपल्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची **"वार्षिक सर्व साधारण सभा" रविवार दि.२९/०८/२०२१ रोजी सकाळी १०.००वा संस्था कार्यालय चांदवड.** येथुन ऑनलाईन झुम मिटिंग व्दारे आपल्या संस्थेचे **चेअरमन मा.श्री.प्रा.निकम टी.पी.** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी बोलविण्यात येत आहे.तरी सर्व सभासदांनी मोबईल झुम ॲप व्दारे कनेक्ट करून उपस्थिती दर्शवावी ही नम्र विनंती!

## सभेपुढील विषय

१) मा.नियोजीत अध्यक्षांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वृत्त वाचून कायम करणे.
३) सन २०२०-२०२१ सालाचे नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद व संचालक मंडळाचा अहवाल वाचुन कायम करणे.
४) सन २०२०-२०२१ च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
५) सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
६) सन २०२०-२०२१ च्या वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चाला मान्यता देणे.
७) सन २०२०-२०२१ वर्षाचे ऑडीट मेमोचे वाचन करून दोष दुरूस्तीस मंजुरी देणे.
८) सन २०२१-२२या वर्षाकरिता लेखापरिक्षकाची नेमणुक करणेबाबत.
९) उप समितीच्या अहवालावर चर्चा करणे बाबत.
१०) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील महात्मा फुले संजीवनी योजनेचे वाचन करून विमा क्लेम मंजुर करणेबाबत.
११) वार्षिक सर्वसाधरण सभेस अनुपस्थित असणा-या सभासदाची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१२) मा.अध्यक्ष साहेब यांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.


**आपले नम्र**

| | | |
|---|---|---|
| **श्री.सतिश आहेर** | **श्री गोपिनाथ खैरे** | **श्री.प्रा.निकम टी.पी.** |
| प्र.मॅनेजर | व्हा.चेअरमन | चेअरमन |

**मा.संचालक मंडळ**

## सुचना

१) ज्या सभासदांना माहिती हवी असेल अगर काही सुचना करावयाच्या असतील त्यांनी दि.२०/०८/२०२१ पर्यंत लेखी कळवावे.
२) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर कोरम असो वा नसो सभेचे कामकाज पुर्ण करण्यात येईल.




ऋणातून समृद्धीकडे

**महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)**

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता.चांदवड जि.नाशिक फोन नं.:-२५२३३०

रजि.नं.: एनएसके /सीएचडी/आरएसआर/सीआर/८४० दि.२९/०५/२००१


# सन २०२० - २०२१चा वार्षिक अहवाल

सस्नेह नमस्कार ......

सर्व सन्माननीय सभासद बंधू - भगिनींनो ,

**आज २०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी** आलेल्या सर्व सन्माननीय सभासदांचे महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सर्वांचे मनःपुर्वक स्वागत करतो.दि.३१/०३/२०२१ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या प्रगतीचा आलेख मांडण्यासाठी मी आपल्या समोर उभा आहे.नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षातील नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद संचालक मंडळाच्या वतीने सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

चांदवड तालुक्यातील सर्व सभासदांनी आमच्यावर विश्वास दाखवून मोलाचे सहकार्य केले.ठेवीदारांच्या व सभासदांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतलेली आहे.संस्थेने कठीण निकश लावुन कर्ज वाटप कर्ज वसुली व दैनदिन कामकाज केले आहे. त्याची फल निष्पत्ती म्हणुन संस्थेला सलग ६ वर्षे "अ तारांकीत" तर १४ वर्ष "अ" ऑडीट वर्ग मिळालेला आहे.हया वर्षात संस्थेने ~~अठरा~~ 20 वर्ष पुर्ण केले आहे.२०वर्षाच्या कालावधीत संस्था स्वयंपुर्ण झालेली असुन आर्थिक दृष्टया मजबुत आहे.स्वतःच्या मालकीच्या अदयावत भव्य नुतन वातानुकूलित वास्तुत संगणकीकरणासह सुसज्ज अवस्थेत आज हि संस्था आपण पाहत आहोत.

सन २००१ रोजी समाजाने लावलेले हे छोटेसे रोपटे आज त्याचे कल्पवृक्षात रूपांतर झाल्याचा चमत्कार आपण पाहात आहोत. चांदवड तालुक्यात अग्रगण्य व शिस्तबध्द, प्रभावी प्रशासन असलेली संस्था म्हणून **महात्मा फुले नागरी सह.पतसंस्थेची** ओळख झालेली आहे. सुरूवातीपासून संस्थेच्या सर्व व्यवहारात नियोजन बध्दता,पारदर्शकता,तत्परता,विश्वासार्ह ता व आर्थिक शिस्ती बरोबर कार्यालयीन शिस्त राखण्याचे काम संचालक





मंडळाने केलेले आहे. ते केवळ आपल्या बहुमोल सहकार्यामुळे शक्य झालेले आहे. संस्थेच्या नेजदिपक प्रगतीत आपला मोलाचा वाटा आहे. चांदवड तालुक्यातील अनेक नामांकित पतसंस्था आहे, त्यांच्याशी निर्मळस्पर्धा करून, दुष्काळ, आर्थिक मंदी, व गारपीट, नोटाबदली, मार्च २०२० पासुन संपुर्ण जगाला कोरोना विषाणुच्या महामारीने ग्रासलेले आहे. अशा मोठया संकटाला समोरी जावुन संस्थेने उकृष्ट कर्जवसुली केलेली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सहकार खात्यांनी लादलेले निर्बंध या सर्वांना सक्षमपणे सामोरी जावून संस्थेने गरजु व होतकरू तरूणांना, सभासदांना व्यावसायिकांना कर्ज वाटप केले आहे. सभासदांनी देखील आर्थिक शिस्तीचे दर्शन घडविल्यामुळे आम्ही ९७% कर्जवसुली करू शकलो ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे. म्हणुन सभासदांना मी धन्यवाद देतो व असेच सहकार्य मिळो अशी आपेक्षा करतो.

दरवर्षी वाढता नफा, वाढत्या ठेवी ही संस्थेच्या दृष्टीने भूषणावह गोष्ट आहे. आज **"महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था"** ही अंतर -बाहय सुंदर व आर्थिक दृष्टया सक्षम असलेली तालुक्यातील एकमेव संस्था आहे. या श्रेयाचे मानकरी संचालक मंडळ असले तरी खरे श्रेयाचे मानकरी हे सन्माननीय सभासद आहे. त्यांच्याच सहकार्यामुळे संस्थापक प्रा. निकम टी.पी. यांच्या स्वप्नांना मुर्त स्वरूप आले आहे. संस्थेच्या आजपर्यंतच्या या प्रगतीचे, संस्थेला नावारूपाला आणून उत्तुंग शिखरावर पोहचविण्याचे खरे शिल्पकार संस्थापक प्रा. निकम टी.पी. हे आहे.

संस्थेच्या प्रगतीचे २० वर्षाचे प्रतिबिंब पत्रक आपणास दिले आहे, गेली २० वर्षापासुन आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीचा आलेख वेगाने उंचावत आहे. या वर्षी देखील संस्थेला 'अ' ऑडीट वर्ग मिळालेला असुन वेटेज ॲव्हरेज पध्दतीनुसार १००पैकी ८६ गुण मिळालेले आहे. ऑडिट मेमोमध्ये आजपर्यंत कोणत्याही प्रकारच्या आर्थिक व्यवहाराबाबत, व्यवस्थापना बाबत गंभीर अरोप किंवा दोष नोंदविलेले नाही हे मी अभिमानाने आपणास सांगु इच्छितो, या सर्व गोष्टिंचा तुम्हाला व आम्हाला रास्त अभिमान वाटवा अशी ही बाब आहे. गुणात्मक दृष्टया आपली पतसंस्था नंबर १ आहे हेच आपल्या पतसंस्थेचे खास वैशिष्टये आहे, असेच आपले सर्वांचे सहकार्य राहील अशी आशा बाळगतो. संस्था याच वेगाने विकासाच्या दिशेने उंच भरारी घेईल अशी मी संचालकांच्या वतीने ग्वाही देतो. पुनःश्च एकदा आपले मनःपुर्वक हार्दिक स्वागत करून आपल्या शुभेच्छा हृदयाशी बाळगून २९वा वार्षिक





अहवाल आपणापुढे सविनय सादर करीत आहे.

**भागभांडवल :-**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल ५०लाख रूपये असून दि.३१/०३/२०२१ अखेर संस्थेचे एकुण सभासद संख्या ३०५ असुन वसूल भागभांडवल २४,८७,९००=०० रूपये आहे.अहवाल सालात भागभांडवलात ९५,६००=०० रूपयांनी वाढ झालेली आहे.

**राखीव व इतर निधी :-**

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व स्थैर्याची कल्पना तिच्या एकूण निधी वरून लक्षात येते.कारण राखीव व इतर निधी हाच संस्थेचा आत्मा आहे. दि.३१/०३/२०२१ अखेर संस्थेचा निधी रूपये १,७५,४७,५६०=०७ असून अहवाल वर्षात निधीमध्ये रूपये १९,९९,५७६=५५ने वाढ झालेली आहे.

**ठेवी :-**

संस्थेचे पारदर्शी कामकाज व संस्थेवरील दृढ विश्वास यामुळे अनेक हितचिंतक व स्नेही बांधवांनी उत्स्फुर्तपणे ठेवी ठेवल्यामुळे ठेवीमध्ये प्रतिवर्षी प्रंचड वेगाने वाढ होत आहे.ही संस्थेच्या दृष्टीने कौतुकाची गोष्ट आहे.ठेवीत होणारी वाढ ही सभासद व परिवाराच्या विश्वासाचे प्रतिक आहे. या वर्षाअखेर संस्थेच्या ठेवी रूपये ७,३३,८९,३३२=३२ इतक्या आहे.सदर ठेवी अत्यंत सुरक्षीत आहे असे मी चेअरमन या नात्याने आपणांस सांगू इच्छिते.

**कर्ज वाटप :-**

संस्थेने व्यापारी, शेतकरी, शेतमजूर,कामगार,मजूर,नोकरवर्ग,उदयोजक इत्यादी सर्व गरजू व होतकरू लोकांना ‘क्रियाशिल’ ‘सर्वसाधरण’ व ‘नाममाज’ सभासदवर्गातून कर्ज वाटप केलेले आहे.

कर्ज वाटप करतांना त्यांची विश्वासार्हता व कर्ज परत फेडिची क्षमता या गुणात्मक कसोटीच्या आधारे रूपये ३,५१,४६,१५५=०० इतके कर्ज वाटप केलेल आहे.

**थकबाकी :-**

थकबाकी वसूल करणे हे पतसंस्थेच्या कामकाजातील सर्वात

कठीण काम आहे.परंतु वसुली हा संस्थांचा आत्मा असून त्यावर संस्थेचे अस्तित्व व विकास अवलंबून असतो. संस्थेचे संस्थापक चेअरमन प्रा. निकम टि.पी.,कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न व सभासदांनी दिलेली मोलाची साथ यामुळे दि.३१/०३/२०२१ अखेर संस्थेने ९७% इतकी कर्जवसुली केली आहे.थकबाकी असलेल्या सभासदांवर कलम ९१ व कलम १३८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.सर्व कर्जदार सभासदांनी नियमित कर्ज भरून संस्थेला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो.एन.पी.ए.ची तरतुद पूर्णपणे केलेली असून संस्थेचे एन.पी.ए.चे प्रमाण १.५६% इतके आहे.संस्थेचा सी.डि.रेशो ३१.५% आहे.

## गुंतवणूक :-

सहकार खात्याने पतसंस्थेला घालून दिलेल्या सी.डी.रेशोचे आपल्या पतसंस्थेने पूर्णपणे यापुर्वी पालन केलेले आहे. संस्थेच्या नियोजनपूर्वक व अत्यंत सुरक्षित पध्दतीने रूपये ५,४२,११,३६६=00 रूपयांची गुंतवणूक केलेली आहे.परतुं केंद्रसरकारने ७.५% टि.डी.एस.कपातीचे आदेश को ऑफ बॅकाना दिल्यामुळे संस्थेच्या अर्थकारणावर त्याचा प्रतिकुल परीणाम होण्याची भिती आहे.

## संचालक मंडळ सभा :-

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झालेल्या असुन संचालकांनी स्वतःची कामे बाजुला ठेवुन संस्थेच्या विकासासाठी कमाल वेळ दिलेला आहे म्हणुन संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. यापुढेही असेच सहकार्य मिळेल अशी मी आपेक्षा बाळगतो .

## नफा:-

गुणात्मक कर्ज वाटप व कमाल कर्जवसुली, खर्चात काटकसर, कुशल व्यवस्थापन व कौशल्यपूर्ण गुंतवणूक या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे या वर्षात संस्थेला १५,00,000=00 रूपये निव्वळ नफा झालेला आहे. या वर्षी संस्थेने १५,00,000=00 रूपयांच्या नफ्यातुन उपविधीच्या अधिन राहुन नियमाप्रमाणे सर्व प्रकारच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहे.प्रतिवर्षी वाढता नफा संस्थेच्या दृष्टीने गौरवास्पद गोष्ट आहे .



ऋणातून समृद्धीकडे

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चांदवड (नाशिक)

रेणुका कॉम्प्लेक्स पहिला मजला चांदवड ता. चांदवड जि. नाशिक फोन नं. ः-२५२३३०

रजि. नं. ः एनएसके /सीएचडी/आरएसआर/सीआर/८४० दि. २९/०५/२००१

**कर्मचारी परिवार :-**

आपल्या संस्थेस अतिशय कार्यक्षम,प्रामाणिक व समर्पित भावनेने प्रेरित असे ५कर्मचारी वर्ग लाभलेले आहे . संस्थेच्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. संस्थेच्या विकासावरच कर्मचाऱ्यांचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून संस्थेतील कर्मचारी परिवाराने ध्येयाने प्रेरित होवून निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करावे कारण आपणांस विकासाचा अजून बराच मोठा टप्पा गाठावयाचा आहे.

**लेखा परिक्षण :-**

संस्थेच्या लेखा परिक्षणावरून संस्थेचे खरे चित्र समजते. संस्थेला यापुर्वी ६ वर्ष सतत "अ स्टार" ऑडीट वर्ग मिळालेला आहे . तर १४वर्ष 'अ' ऑडीट वर्ग मिळालेला आहे. या वर्षी वेटेज ॲव्हरेज १०० पैकी ८६% गुण मिळवून संस्थेने चांदवड तालुक्यात प्रतिष्ठेचे व नंबर एकचे स्थान मिळविले आहे. ही आपणा सर्वांच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे.

**आभार :-**

आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीत सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. मा. सहाय्यक निंबधक सो. श्री. पाटोळे ,सहकार व बँकिंग क्षेत्रातील सर्व अधिकारी,तसेच श्री. शिवाजीराव सोनवणे (कायदेशिर सल्लागार), संस्थेचे वाहन व्हॅल्युअर श्री. अभयकुमार मेहता (मालेगांव), सहकार,राजकीय , शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपला बहुमुल्य वेळ देवून संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन केले,भेटी देवून सुचना केल्या त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

॥ जय हिंद...! ॥

आपला स्नेहांकित,

(मा. प्रा. निकम टी. पी.)

चेअरमन

...मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्या., चांदवड
NSK/CHD/RSR/CR/८४० दि.२९-०५-२००१ फोन.नं.०२५६-२५२३३
mahatmaphulenpchandwad@gmail.com

As On Date ३१/०३/२०२१

| खाते कोड | रक्कम | एकुण | खाते कोड | रक्कम | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षण निधी देणे | १0000.00 | | टर्म लोन | २९९५0३६.00 | |
| ठेवीवरिल व्याज देणे | १६५९९३३.१0 | | सामान्य कर्ज | ४0४३७३५.00 | |
| व्यवसाय कर देणे | ८00.00 | | इतर येणे | | १५७९३७२.00 |
| थकित येणे व्याज तरतुद | ४६0६८५.00 | | टेलिफोन अनामत खाते | २000.00 | |
| सेवक सानुग्रह अनुदान | १४७२३१.७५ | | गुंतवणुकि वरील येणे व्याज | १४९३६८६.00 | |
| आर.सी. बुक डिपाझीट | ४२000.00 | | टी.डी.एस खाते | ८३६८६.00 | |
| सेवक प्राव्हिडंट फंड पोस्ट ऑफिस | १२६३५४.00 | | कायम मालमत्ता | | २६00१0.00 |
| सशस्त्र सेना ध्वज तरतुद | ४७00.00 | | कायम मालमत्ता खाते | २६00१0.00 | |
| भविष्य निर्वाह निधी व्याज देणे तरतुद | १७६१.00 | | डेडस्टॉक | | १९४0५५.00 |
| सेवक प्राव्हिडंट फंड | ८१९४१७.00 | | डेडस्टॉक खाते | १९४0५५.00 | |
| घसारा तरतुद | २१४२७.00 | | देणीव तरतुद | | ४६0६८५.00 |
| निव्वळ नफा | | १५00000.00 | कर्जावरील व्याज येणे | ४६0६८५.00 | |
| | एकुण | ९८२२६३८५.२४ | | एकुण | ९८२२६३८५.२४ |

चेअरमन मॅनेजर

हात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्या.चांदवड

महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था [illegible] .च [illegible]
रजि. नं --एन.एस.के./सि.एच.डी./आ.एस.आर/सि.आर/दि.२९/०५/२००१
EMAIL ID: mahatmaphulenpchandwad@gmail.com फोन नं. ०२५५६/२५२३३

# नफा - तोटा पत्रक

खर्च | आजपर्यंत --- ३१/०३/२०२१ | उत्पन्न

| खाते नाव | रक्कम | एकुण | खाते नाव | रक्कम | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| **इतर खर्च** | | ४०६४२८.०० | **व्याज उत्पन्न खाते** | | ४८५६१८२.०० |
| पोस्टेज व टेलिफोन खर्च | २१७२०.०० | | वाहन तारण कर्जावरील व्याजजमा | २९९७४५.०० | |
| प्रिंटिंग खर्च | ३७५४०.०० | | मॉरगेज व्यवसायीक व्याजजमा उत्पन्न | ७५८४४८.०० | |
| किरकोळ खर्च | १८७२०.०० | | नजरगहाण कॅश क्रेडीटव्याजजमा उत्पन्न | ३९६५७७.०० | |
| लाईट बिल खर्च | ३२११०.०० | | सोने चांद कर्जावरील व्याजजमा | १३५०१७२.०० | |
| प्रवास खर्च | ११७०.०० | | मुदत ठेव तारण व्याजजमा उत्पन्न | १०५८७७.०० | |
| वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | २२४२०.०० | | गृह बांधणी कर्जावरील व्याजजमा | १०४३००५.०० | |
| जाहिरात खर्च खाते | ३२२६०.०० | | टर्म लोनवरिल व्याज | ३५५२१३.०० | |
| व्यवसाय कर खर्च | ७५०.०० | | सामान्य कर्जावरिल व्याज | ५४७१४५.०० | |
| मानधन खाते | ६३०००.०० | | **गुंतवणुकि वरील व्याज** | | २८७३०३६.०० |
| दुरुस्ती व देखभाल खर्च खाते | २८३४६.०० | | गुंतवणुकि वरील व्याज खाते | २८७३०३६.०० | |
| वकिल फी खर्च खाते | ४९८०.०० | | | | |
| चांदवड नगरपरिषद कर | ४३१०.०० | | | | |
| भविष्य निर्वाह निधी | ७२५३९.०० | | | | |
| आरटिओ ट्रेड सर्टिफिकेट खर्च खाते | ३२००.०० | | | | |
| वॉचमन खर्च खाते | १२००.०० | | | | |
| चहापान खर्च | २०२५.०० | | | | |
| सेवक सानुग्रह अनुदान खर्च | ६०१३८.०० | | | | |
| **व्याज खर्च खाते** | | ५१५४९२२.१० | | | |
| मुदत ठेवीवरील व्याज खर्च | २८८४७६९.१० | | | | |
| बचत ठेवीवरील व्याज खर्च | २८६१६८.०० | | | | |
| दामदुप्पट ठेवीवरील व्याज खर्च | १६८३७.०० | | | | |
| जेष्ठ नागरिक ठेवीवरिल व्याज | ११९६७१४८.०० | | | | |
| **पगार खाते** | | ६६७५०२.०० | | | |
| पगार खाते | ६६७५०२.०० | | | | |
| **बॅक चार्जेस** | | ३६५.९० | | | |
| बँक चार्जेस | ३६५.९० | | | | |
| | एकुण खर्च | ६२२९२१८.०० | | एकुण उत्पन्न | ७७२९२१८.०० |
| | निव्वळ नफा | १५०००००.०० | | | |
| | एकुण | ७७२९२१८.०० | | एकुण | ७७२९२१८.०० |

३१/०३/२०२१

| खाते नाव | रक्कम | एकुण | खाते नाव | रक्कम | एकुण |
|---|---|---|---|---|---|

चेअरमन मॅनेजर

महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्या. चांदवड